८.७०
२-०५-२०२३

# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : ०२/०५/२०२३

## प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

आज दिनांक १ मे, २०२३ रोजी महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून संपुर्ण राज्याभरात "हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना" या योजनेचे मा.मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे, मा.उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस व मा. आरोग्य मंत्री डॉ. तानाजी सावंत यांच्या उपस्थितीत मा.मुख्यमंत्री महोदय यांचे शुभहस्ते डिजीटल अनावरण करण्यात आले.

उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये वैद्यकीय आरोग्य विभाग अंतर्गत कमला नेहरु-लोकमान्य टिळक नगर, उल्हासनगर-१ येथे "हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना" सुरु करण्यात आलेला आहे. सदर कार्यक्रमास मा. आमदार श्री. कुमार आयलानी, मा.प्रशासक तथा आयुक्त श्री. अजीज शेख, श्री. सुभाष तनावडे, परिवहन सभापती, श्रीम. डॉ. करुणा जुईकर अतिरिक्त आयुक्त (सेवा), श्री. जमीर लेंगरेकर, अतिरिक्त आयुक्त (शहर), श्री. अशोक नाईकवडे, उप आयुक्त (मुख्यालय), डॉ. सुभाष जाधव, उप आयुकत (वै.आ.वि), डॉ.अनिता सपकाळे, वैद्यकीय आरोग्य विभाग, श्री. किरण भिलारे, मुख्य लेखा अधिकारी, श्री. शदर देशमुख मुख्य लेखा परिक्षक, सन्मानिय आजी/माजी लोकप्रतिनिधी, समाजसेवक, इतर मान्यवर, विभाग प्रमुख व कर्मचारी वर्ग उल्हासनगर महानगरपलिका उपस्थित होते.

"हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना" या आरोग्य वर्धीनी केंद्रा मार्फत उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांस मोफत तपासणी, मोफत औषधे व मोफत उपचार व ३० प्रकाराच्या प्रयोगशाळा चाचण्या तसेच आवश्यकतेनुसार तज्ञ व संदर्भसेवा देण्यात येतील असे मा.प्रशासक तथा आयुक्त यांनी सांगितले व महाराष्ट्र शासनाच्या या महत्वकांक्षी योजनेचा सर्व उल्हासनगर महानगरपालिकेच्या नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले तसेच वैद्यकीय आरोग्य विभागास उर्वरित नागरी आरोग्य वर्धीनी केंद्र लवकरात लवकर सुरु करणेबाबत निर्देश दिले.

सदर कार्यक्रमाचे प्रस्तावित डॉ. अनिता सपकाळे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी केले व कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री. जमीर लेंगरेकर, अतिरिक्त आयुक्त (शहर) यांनी केले.

२/५/२३

जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत —माहितीस्तव सादर.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
१. पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२. सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
सदरची प्रेसनोट उल्हासनगर महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.